SEMANA VIDYA VA VANVIKAS PRASHIKSHAN MANDAL Reg. No. F2301/Gad/Ma

# Gramgeeta Mahavidyalaya

**Arts , Commerce & Science**

**Chimur**, Dist. Chandrapur ( M.S.) Mob.9422128453

Email :gmcchimur@gmail.Com

NAAC Accredited B+ with CGPA 2.68

## * सुचना *

**ग्रंथालय सल्लागार समिती सभा**

**ऑगष्ट 2024**

महाविद्यालयातील ग्रंथालय सल्लागार समितीच्या सर्व सभासदांना सूचित करण्यात येत आहे की, दिनांक 23 ऑगष्ट 2024 रोज शुक्रवारला सकाळी 11:30 वाजता कार्यकारी प्राचार्य प्रा. हुमेश्वर आनंदे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालय सल्लागार समितीची सभा आयोजित करण्यात येणार आहे. करिता या सभेला खालील सर्व सदस्य उपस्थित राहावे,ही विनंती.

**सभेचे विषय:-**

**विषय क्र.1:-** मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**विषय क्र.2:-** मागील आर्थिक वर्षात झालेल्या खर्चाचा आढावा घेणे आणि चालू सत्रातील अंदाजे खर्चाला मान्यता प्रदान करणे.

**विषय क्र.3:-** ग्रंथालय विभागामध्ये ग्रंथ खरेदी करणे.

**विषय क्र.4:-** माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.

| **सभासदांचे नाव** | **सह्या** |
|---|---|
| १) प्रा. हुमेश्वर आनंदे-अध्यक्ष | |
| २) डॉ. वरदा खटी -समिती सदस्या | |
| ३) प्रा. निलेश ठवकर -समिती सदस्य | |
| ४) प्रा. प्रफुल्ल ढोणे -समिती सदस्य | |
| ५) कु.प्राजक्ता तांबरे - विद्यार्थी प्रतिनिधी | |

**समिती सचिव**

प्रा. संदिप ए. मेश्राम

**प्राचार्य**

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur. Dist. Chandrapur

SEMANA VIDYA VA VAN VIKAS PRASHIKSHAN MANDAL, GADCHIROLI

# Gramgeeta Mahavidyalaya, Chimur

Arts, Commerce and Science (Granted)
Dist. Chandrapur (M.S.) 442903

## ग्रंथालय सल्लागार समिती इतिवृत्त
## ऑगष्ट 2024

आज दिनांक 23 ऑगष्ट 2024 रोज शुक्रवारला सकाळी 11:30 वाजता ग्रामगीता महाविद्यालयाच्या ग्रंथालय सल्लागार समितीची सभा माननीय कार्य. प्राचार्य प्रा. हुमेश्वर आनंदे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. या सभेला पुढील प्रमाणे सर्व सदस्य उपस्थित होते. सभेदरम्यान खालील सर्व विषयावर ठराव मंजूर करण्यात आले.

| सभासदांचे नाव | सह्या |
|---|---|
| १) प्रा. हुमेश्वर आनंदे- कार्य. प्राचार्य (अध्यक्ष) | ---------------------- |
| २ ) डॉ. वरदा खटी -समिती सदस्या | ---------------------- |
| ३) डॉ. निलेश ठवकर -समिती सदस्य | ---------------------- |
| ४) प्रा. प्रफुल्ल डोंगे -समिती सदस्य | ---------------------- |
| ५) कु. प्राजक्ता तांबरे - विद्यार्थी प्रतिनिधी | ---------------------- |
| ६) प्रा. संदिप मेश्राम-समिती समन्वयक | ---------------------- |

| | |
|---|---|
| विषय क्र.1:-<br>मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | ठराव क्र.1:-<br>ग्रंथालय सल्लागार समितीची मागील सभा दिनांक 19 जानेवारी 2024 रोजी पार पडली होती. त्या सभेचे इतिवृत्त प्राध्यापक संदीप मेश्राम, समिती सचिव यांनी सभेत उपस्थित सर्वासमोर वाचून सादर केले. या इतिवृत्तावर औपचारिक चर्चा करून सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आले. |
| विषय क्र.2:-<br>मागील आर्थिक वर्षात झालेल्या खर्चाचा आढावा घेणे आणि चालू सत्रातील अंदाजे खर्चाला मान्यता प्रदान करणे. | ठराव क्र.2:-<br>आजच्या सभेमध्ये कार्य. प्राचार्य प्रा. हुमेश्वर आनंदे यांनी मागील आर्थिक सत्रामध्ये झालेल्या खर्चाचा आढावा मागितला असता समिती सचिव प्रा. संदीप मेश्राम यांनी, ग्रंथ खरेदीसाठी 87346/-, आणि DELNET सबस्क्रीप्शन फी 13570/- -अशा प्रकारे एकूण खर्च |

| | |
|---|---|
| | 1,00,916/- करण्यात आला असे सांगितले. त्यानंतर समिती सभासदांनी पुढील अंदाजे खर्चाची माहिती विचारली असता समितीचे सचिव यांनी ग्रंथ खरेदीसाठी 80000/- ,नियतकालिकांच्या वर्गणीसाठी 15000/-आणि DELNET सबस्क्रीप्शन फी यासाठी 13570/- व इतर किरकोळ साहित्य खरेदीसाठी 10000/-असे सर्व मिळून 118570/-रुपयाचे अंदाजे खर्च असल्याचे सांगितले. त्यावर सर्व सभासदांनी चर्चा करून ग्रंथालय विभागासाठी1,10,000/-चे अंदाजे खर्चास मंजुरी प्रदान केली. ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. |
| विषय क्र.3:-<br>ग्रंथालय विभागासाठी ग्रंथ खरेदी करणे. | ठराव क्र.3:-<br>आजच्या सभेमध्ये सभा सुरु असतांना प्रा. निलेश ठवकर यांनी आपले मत व्यक्त केले आणि या सत्रापासून नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठाने अभ्यासक्रम तयार केला असल्यामुळे ग्रंथालय विभागात नवीन अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तके खरेदी करण्यात यावे असे सुचविले असता कार्य. प्राचार्य प्रा. हुमेश्वर आनंदे यांनी सहमती दर्शवून नवीन अभ्यासक्रमाशी संबंधित पाठ्यपुस्तके ग्रंथालयात खरेदी करण्यात यावे असे सांगितले.<br>ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. |
| विषय क्र.4:-<br>माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय. | ठराव क्र.4:-<br>सभा सुरु असतांना अध्यक्षांनी सभासदांना काही प्रश्न असल्यास विचारले असता, ग्रंथपाल प्रा. संदीप मेश्राम यांनी ग्रंथालयात विद्यार्थ्यांचे बी.टी. कार्ड व बारकोड प्रिंट करण्यासाठी कलर प्रिंटरची आवश्यकता असल्याचे सांगितले, सर्व सभासदांनी यावर चर्चा केली व कलर प्रिंटर खरेदी करण्याच्या प्रस्तावाला सहमती दर्शवली. यानंतर समिती सचिव प्रा. संदीप मेश्राम यांनी सर्व सभासदांचे आभार मानून सभा समाप्त करण्याची विनंती केली.<br>ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. |

Librarian
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

SEMANA VIDYA VA VANVIKAS PRASHIKSHAN MANDAL Reg. No. F2301/Gad/Ma

# Gramgeeta Mahavidyalaya

Arts , Commerce & Science
**Chimur**, Dist. Chandrapur ( M.S.) Mob.9422128453
Email :gmcchimur@gmail.Com
NAAC Accredited B+ with CGPA 2.68

## * सुचना *

### ग्रंथालय सल्लागार समिती सभा

### जानेवारी 2025

महाविद्यालयातील ग्रंथालय सल्लागार समितीच्या सर्व सभासदांना सूचित करण्यात येत आहे की, दिनांक 18 जानेवारी 2025 रोज शनिवारला दुपारी 1:00 वाजता मा. प्राचार्य डॉ. सुनंदा एस. आस्वले यांच्या अध्यक्षतेखाली, प्राचार्य यांच्या कार्यलयात ग्रंथालय सल्लागार समितीची सभा आयोजित करण्यात येणार आहे. करिता या सभेला खालील सर्व सदस्य उपस्थित राहावे,ही विनंती.

**सभेचे विषय:-**

**विषय क्र.1:-** मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**विषय क्र.2:-** ग्रंथालय विभागामध्ये ग्रंथ खरेदी करणे.

**विषय क्र.3:-** माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.

| **सभासदांचे नाव** | **सह्या** |
|---|---|
| १) डॉ. सुनंदा एस. आस्वले -प्राचार्य (अध्यक्ष) | |
| २ ) डॉ. वरदा खटी -समिती सदस्या | |
| ३) डॉ. निलेश ठवकर -समिती सदस्य | |
| ४) प्रा. प्रफुल्ल होणे -समिती सदस्य | |
| ५) कु.प्राजक्ता तांबरे - विद्यार्थी प्रतिनिधी | |

समिती सचिव
प्रा. संदिप ए. मेश्राम

प्राचार्य
Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

SEMANA VIDYA VA VAN VIKAS PRASHIKSHAN MANDAL, GADCHIROLI

# Gramgeeta Mahavidyalaya, Chimur

Arts, Commerce and Science (Granted)

Dist. Chandrapur (M.S.) 442903

## ग्रंथालय सल्लागार समिती इतिवृत्त

जानेवारी 2025

दिनांक 18 जानेवारी 2025 रोज शनिवार ग्रामगीता महाविद्यालयाच्या ग्रंथालय सल्लागार समितीची सभा मा. प्राचार्य डॉ. सुनंदा एस. आस्वले यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी 1:00 वाजता आयोजित करण्यात आली. या सभेला खालीलप्रमाणे सर्व सभासद उपस्थित होते. सर्व सभासदांनी चर्चा करून पुढील प्रमाणे ठराव मंजूर केले.

| सभासदांचे नाव | सह्या |
|---|---|
| १) डॉ. सुनंदा एस. आस्वले -प्राचार्य (अध्यक्ष) | ------------------------ |
| २ ) डॉ. वरदा खटी -समिती सदस्या | ------------------------ |
| ३) डॉ. निलेश ठवकर -समिती सदस्य | ------------------------ |
| ४) प्रा. प्रफुल्ल ढोणे -समिती सदस्य | ------------------------ |
| ५) कु. प्राजक्ता तांबरे - विद्यार्थी प्रतिनिधी | ------------------------ |
| ६) प्रा. संदिप मेश्राम-समिती समन्वयक | ------------------------ |

| | |
|---|---|
| विषय क्र.1:-<br>मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | ठराव क्र.1:-<br>ग्रंथालय सल्लागार समितीची मागील सभा ही दिनांक 23 ऑगष्ट 2024 रोजी घेण्यात आली होती. त्या सभेचे इतिवृत्त प्रा. संदीप मेश्राम, समिती सचिव यांनी उपस्थित सभासदांसमोर वाचून दाखविले या इतिवृत्तावर चर्चा करून इतिवृत्त संमत करण्यात आले. ठराव मंजूर. |
| विषय क्र.2:-ग्रंथालय विभागासाठी ग्रंथ खरेदी करणे. | ठराव क्र.2:-<br>आजच्या सभेमध्ये समिती सचिव प्रा. संदीप मेश्राम यांनी असे सांगितले की, पुस्तक-बाजारामध्ये नवीन शैक्षणिक अभ्यासक्रमानुसार पुस्तके पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे ग्रंथ खरेदी करतांना अडथळा येत आहे. परंतु नवीन |

| | |
|---|---|
| | अभ्यासक्रमानुसार कला शाखेचे पुस्तके उपलब्ध होत आहेत. असे मत व्यक्त केले असता प्राचार्या डॉ. सुनंदा आस्वले यांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देणे ही आपली प्राथमिकता असून नवीन अभ्यासक्रमानुसार जे पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देता येतील ते पुस्तके खरेदी करायचे असे सांगितले.<br>यावर चर्चेअंती सर्व सभासदांचे एकमत झाले आणि सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आले. |
| विषय क्र.3:-<br>मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय. | ठराव क्र.3:-<br>सभा सुरु असतांना अध्यक्षांनी सभासदांना काही प्रश्न असल्यास विचारले असता, कोणत्याही सभासदाने प्रश्न उपस्थित केले नाही. परंतु प्राचार्या डॉ. सुनंदा आस्वले यांनी ग्रंथालयाद्वारे 'ग्रंथ-दान करा' ही मोहीम राबवली पाहिजे असे मत व्यक्त केले. यावर चर्चा करण्यात आली व असे ठरविण्यात आले की सर्व प्राध्यापक,विद्यार्थी, पालक यांना आवाहन करून या मोहिमेत सामील करायचे व त्यांच्या घरी पडून असलेले,वाचून झालेले जुनी पुस्तके महाविद्यालयाच्या ग्रंथालयात दान करण्यास प्रवृत्त करावे.<br>ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. |

Librarian
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur